# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ )

## (सामान्य प्रशासन शाखा)

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईन्ट मार्ग, नागपूर-४४००३३
दूरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१२-२९५६३०२, ई-मेल : arga@nagpuruniversity.nic.in

**क्रमांक : रातुमनावि/साप्र/२०/ ६६३** **दिनांक :२७ऑगस्ट, २०२०**

**प्रति,**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक.
३. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक (नागपूर शहरातील)
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

**विषय :-** शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू, पान, तंबाखू यांच्या सेवनास तसेच थुंकण्यास मनाई करण्यात आल्याबाबत.

**संदर्भ :-** नागपूर महानगरपालिकेद्वारा निर्गमित आदेश क्रमांक उपायुक्त(साप्रवि)/९७७/२०२० दिनांक १५/०८/२०२०.

**महोदय/महोदया,**

कोरोना विषाणू (काव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेद्वारा निर्गमित उपरोक्त विषयांकीत संदर्भिय आदेशाची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत असून आपणास विनंती करण्यात येते की, संदर्भिय आदेशात नमूद केलेल्या बाबी आपल्या अधिनस्थ कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणून द्याव्यत व त्यांना आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सूचित करावे.

**आपला,**

**(डॉ. नीरज खटी)**
प्रभारी कुलसचिव

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सामान्य प्रशासन विभाग)

क्रमांक :- उपायुक्त(साप्रवि)/९७७/२०२०
दिनांक :- १५.०८.२०२०

आदेश :-

वाचा :-

१. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम २०२०, दि. १४.०३.२०२०
२. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासन यांचे आदेश दि. १५.०७.२०२०
३. महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि. २९.०७.२०२०
४. या कार्यालयाचे आदेश क्र. एमसी/१५१/२०२०, दि. ३०.०७.२०२०

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हीड-१९) उदभवणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड-१९. उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार उक्त भागात आयुक्त, महानगरपालिका यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी, उक्तप्रमाणे नियम १० अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, विषयांकित आवश्यक उपाययोजनास्तव उपरोक्त नमूद अनु. क्र. ३ व ४ अन्वये दि. ३१.०८.२०२० पर्यंत टप्प्यानिहाय लॉकडाऊन शिथीलतेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे व सदर आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी दारू, पान, तंबाखू यांच्या सेवनास तसेच थुंकण्यास मनाई करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, संदर्भिय क्र. २ अन्वये गुटखा/खर्रा वा तत्सम पदार्थ यांच्या निर्मिती, साठवण, वितरण, विक्री यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, शहरात सार्वजनिक ठिकाणी लोक तंबाखू, खर्रा/गुटखा, पान खावून थुंकल्याने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व त्यामुळे सदर बाबीस प्रतिबंध घालणे लोकहितास्तव आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी तुकाराम मुढे आयुक्त, महानगरपालिका, नागपूर तथा सक्षम प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारान्वये सार्वजनिक आरोग्याच्या हितास्तव खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

१. नागपूर शहरात सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी, खर्रा, गुटखा, पान खाण्यास वा खावून थुंकण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे. जे व्यक्ती याचे उल्लंघन करतील ते सर्व संबंधित रूपये १०००/- (एक हजार रुपये) दंड आकारण्यास पात्र ठरतील.

२. नागपूर शहरात जे व्यक्ती अशी तंबाखू आणि सुपारी जी एक तर स्वादिष्ट सुगंधित किंवा कोणत्याही उक्त अपमिश्रकांसोबत मिसळविली जाते किंवा अन्य नावाने चालणारी किंवा गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/ सुगंधित तंबाखु, स्वादिष्ट / सुगंधित सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखु, खर्रा, मावा या स्वरुपात किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधले जाणारी किंवा कसे, ग्राहकाला मिश्रण करण्यास सहजरित्या सुलभ होईल अशा रितीने विकलेली किंवा वितरीत केलेली स्वदिष्ट / सुगंधित तंबाखु आणि अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तबांखु आणि स्वादिष्ट / सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा वा तस्मम पदार्थ एक उत्पादन म्हणुन किंवा निराळे उत्पादन म्हणुन आवेष्टीत केलेली किंवा खुले असलेल्या आणि किंवा विकलेली किंवा कसे याची निर्मिती, साठवण, वितरण, वाहतूक व विक्री करतील, ते सर्व संबंधित इतर अनुषंगीक कायदेशीर कारवाई व्यतिरिक्त रूपये ५,०००/- (पाच हजार रुपये) दंड आकारण्यास पात्र ठरतील.

या आदेशाची अंमलबजावणी व दंडात्मक कारवाई करण्यास्तव, नागपूर महानगरपालिकेचे उपद्रव शोध व निर्मूलन पथकातील कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, मुख्य स्वच्छता अधिकारी व संबंधित झोनचे सहाय्यक आयुक्त व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे महानगरपालिकेचे सर्व संबंधित अधिकारी, पोलिस उपनिरीक्षक व त्यापेक्षा वरिष्ठ सर्व संबंधित पोलिस अधिकारी तसेच सर्व कार्यालयांमध्ये संबंधित आस्थापना प्रमुखांनी प्राधिकृत केलेले अधिकारी/कर्मचारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी या आदेशाची नोंद घेऊन याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत दक्षता घ्यावी व आवश्यक अनुषंगीक कार्यवाही करावी.

तुकाराम मुंढे (भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१. पोलिस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर
२. सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, नागपूर
३. उपसंचालक (आरोग्य सेवा) नागपूर
४. शिक्षण उपसंचालक, नागपूर
५. जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रूग्णालय, नागपूर
६. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, नागपूर
७. सर्व विभाग प्रमुख, महानगरपालिका, नागपूर
८. सर्व सहाय्यक आयुक्त झोन क्र. १ ते १० यांना उपरोक्तप्रमाणे आवश्यक व्यापक प्रसिध्दी पर्यवेक्षण व अनुषंगीक कार्यवाहीस्तव.
९. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नागपूर
१०. स्टेशन मास्टर, नागपूर रेल्वे स्टेशन

प्रतिलिपी माहितीस्तव:-

१. मा. महापौर/उपमहापौर/स्थायी समिती अध्यक्ष/सत्तापक्ष नेता/ विरोधी पक्ष नेता, म.न.पा. नागपूर
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. जिल्हाधिकारी, नागपूर
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
५. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर
६. रजिस्ट्रार, मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर
७. अधिक्षक, मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

उपायुक्त (साप्रवि)
महानगरपालिका, नागपूर